दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा

|| श्री नागनाथ कृपा ||

प्रो.प्रा.यमपुरे अशोक

8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

छत्रपती संभाजीनगर || वर्ष ६ वे || अंक १८८ || रविवार ०५ जुलै २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे मायलेज कमी ;केंद्र सरकारची कबुली

नवी दिल्ली : देशात पर्यावरणपूरक इंधनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून ई-२० (२० टक्के इथेनॉलमिश्रित) पेट्रोलचा वापर वाढवला जात आहे. मात्र, या इंधनामुळे




वाहनांच्या मायलेजवर काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो, अशी कबुली केंद्र सरकारने पहिल्यांदाच दिली आहे.

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायुमंत्री हरदीपसिंह पुरी यांनी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मात्र, मायलेजमधील ही घट अत्यंत किंचित असेल आणि ती केवळ इथेनॉलमुळेच नाही, तर इतर अनेक घटकांवरही अवलंबून असू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

हरदीपसिंह पुरी यांनी मायलेज कमी होण्याच्या चर्चेवर स्पष्टीकरण देताना सांगितले की, इथेनॉलचा वापर आता रेसिंग कार्समध्येही मोठ्या प्रमाणावर केला जातो, हे आता सिद्ध झाले आहे. यामुळे वाहनाचे ऑक्सिलेशन (पिक-अप) सुधारते आणि इंजिनमधील 'नॉकिंग'ची (खडखडाट) समस्याही कमी होते. त्यामुळे मायलेजमध्ये जर थोडी घट झाली, तर त्याला कारमधील इतर तांत्रिक गोष्टी किंवा ड्रायव्हिंगची पद्धत यासारखे इतर अनेक घटक कारणीभूत असू शकतात. वाहन उत्पादक संघटना आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया यासारख्या सर्वसंबंधित संस्थांशी चर्चा करूनच ई-२० पेट्रोल बाजारात आणले गेल्याचे त्यांनी सांगितले.

## मतदार पुनरिक्षण प्रक्रियेत घोटाळा? ; 'एसआयआर' योजनेत डेटामध्ये फेरफार

मुंबई : लोकशाही प्रक्रियेची पारदर्शकता आणि राष्ट्रीय सुरक्षेशी थेट संबंधित असलेल्या मतदार याद्या शुद्ध करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून राबवण्यात येणा-या विशेष संक्षिप्त मतदार पुनरिक्षण कार्यक्रमात नवी मुंबईत अनियमिततेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

नवी मुंबईमधील ऐरोली-बेलापूर मतदारसंघांमध्ये 'एसआयआर'योजनेअंतर्गत करण्यात येणा-या ऑनलाईन मॅपिंग प्रक्रियेत थेट डेटा फेरफार करून कामाची टक्केवारी कृत्रिमरीत्या वाढवण्यात आल्याचा आरोप पुढे आला आहे.




समोर आलेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील ऐरोली परिसरात कार्यरत असलेल्या एका अधिका-याने महिला बीएलओ कर्मचा-यांना दबाव आणि दमदाटी करत अधिकृत सॉफ्टवेअरचे गोपनीय ओटीपी स्वत:कडे घेतले. त्यानंतर प्रत्यक्षात केवळ १० ते २० टक्के काम पूर्ण झालेले असतानाही सिस्टीममध्ये फेरफार करून ऑनलाईन मॅपिंगची प्रगती थेट ५० टक्क्यांपर्यंत दाखवण्यात आल्याचे उघड झाले आहे.

या घटनेमुळे संपूर्ण मतदार पुनरिक्षण प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, निवडणूक व्यवस्थेतील पारदर्शकतेबाबत नवे वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आता याप्रकरणी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी नेमका काय खुलासा करतात, याकडे राजकीय वर्तुळासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

केंद्र सरकारने देशभरातील मतदार याद्यांमध्ये असलेली बोगस नावे हटवणे, मतदारांचे अचूक पत्ते तपासणे आणि दुबार नोंदणी रोखणे या उद्देशाने 'एसआयआर'योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत स्थानिक प्रशासनांना ऑनलाईन पडताळणी आणि मॅपिंगची जबाबदारी देण्यात आली आहे.

नवी मुंबई महापालिका प्रशासनाने या कामासाठी खासगी शिक्षक, आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविकांची बीएलओ म्हणून नियुक्ती केली आहे. मात्र आता याच प्रक्रियेत गोपनीय माहितीचा गैरवापर करून अधिकृत डेटामध्ये छेडछाड झाल्याचे समोर आल्याने निवडणूक यंत्रणेतील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

## जैन विद्यार्थ्यांसाठी राज्यात सात ठिकाणी वसतिगृह उभारणार: ललित गांधी

मुंबई : जैन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी राज्यात मुंबई, पुणे, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, कोल्हापूर एकूण सात ठिकाणी वसतिगृह उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाच्या संचालक मंडळाच्या चौथ्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली.यावेळी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज व व्याज परतावा योजनांच्या सुधारित प्रारूपास मान्यता देण्यात आली.



तसेच विहारधाम निर्माण योजना आणि पाठशाळा आधुनिकीकरण व सक्षमीकरण योजना राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व या संदर्भात राज्यभराचे सर्वेक्षण त्वरित पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ कडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या वसतिगृह उभारणीसंदर्भात प्राप्त मागण्यांवर चर्चा करून राज्यात मुंबई, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, कोल्हापूर या सात ठिकाणी विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.याशिवाय, मराठी जैन साहित्य विश्वकोष निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना व इतर रोजगाराभिमुख योजनांचा जैन युवकांना लाभ मिळावा यासाठी उद्योग विभागाच्या सहकार्याने विशेष अभियान राबविणे, तसेच महिला व बाल विकास विभागाच्या सहकार्याने महिला बचत गटांसाठी विविध योजना राबविण्याबाबतही निर्णय घेण्यात आला. महिलांना कुटीर उद्योगासाठी १० हजार ते १ लाख पर्यंतचे कर्ज बिनव्याजी देण्याच्या योजनेची अंमलबजावणी त्वरित सुरु करण्याचा निर्णय घेण्यात येवून येत्या पंधरावड्यात याचे अर्ज वितरीत केले जातील असे ललित गांधी यांनी सांगितले.मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार महामंडळाच्या विविध योजनांमध्ये जैन समाजाचा अधिकाधिक सहभाग वाढविण्यासाठी समाजातील प्रमुख व्यक्तींना योजनांची माहिती देण्याच्या उद्देशाने विविध ठिकाणी विशेष बैठका आयोजित करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळासाठी राष्ट्रीय महामंडळाकडून १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी नवी दिल्ली येथे झालेल्या सामंजस्य करारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. याबद्दल समन्वयक संदीप भंडारी यांनी अध्यक्षांच्या कार्याचा गौरव करत अभिनंदनाचा ठराव मांडला. हा ठराव उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने मंजूर करून अध्यक्षांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

बैठकीसाठी सचिव माधवी खोडे-चवरे व्यवस्थापकीय संचालक मेघना शिंदे, महिला बालविकास अधिकरी गौरी दोंदे, वित्त विभागाच्या अधिकारी रचना दरेकर, कौशल्य विकास विभागाचे आनंद माळी, समन्वयक संदीप भंडारी, महामंडळाचे सदस्य रावसाहेब पाटील, सुनील पाटणी तसेच विकास अच्छा, अमित जैन, दर्शना जैन, विश्वजीत कोल्हापुरे, प्रशांत गौडाजे आदी मान्यवर उपस्थित होते.

## विचार बदला-वृत्ती बदलेल दृष्टी बदला - दृश्य बदलेल

आपल्या आयुष्याची इमारत भक्कमपणे उभी राहण्यासाठी आपल्या विचारांचा पाया मजबूत आणि भक्कम असायला हवा..ध्येयापर्यंत पोंहचण्यासाठी धडपडणं अयोग्य नक्कीच नाही. परंतू असं धडपडूनही अपेक्षीत यश लाभलं नाही तर नियती जे देईल ते सहर्ष आणि आनंदान स्विकारता आलं पाहिजे.. एखाद्या घटनेकडे पाहण्याची व आपली दृष्टी बदलण्याची ताकत त्या विचारांत आहे..म्हणूनच सुविचार व सकारात्मक विचार ही माणसाच्या आयुष्यातील सगळ्यात मोठी शक्ती आहे.. ''चांगले शब्द'' हे नेहमीच विचार बदलतात आणि ''सुंदर विचार'' आपलं आयुष्य बदलून टाकतात...

जो सकारात्मक विचार करतो, त्याला डोळ्यांना न दिसणाऱ्या गोष्टी दिसतात, स्पर्श न करता येणाऱ्या, अमूर्त अशा गोष्टी जाणवतात. आणि त्यामुळेच तो अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करू शकतो. ''ज्यांची स्वप्ने खरंच दमदार असतात त्यांनाच ध्येयप्राप्ती होते..निव्वळ पंख असून काहीच उपयोग नाही.. कारण मित्रांनो जिद्दीमुळेच आपले उड्डाण सफल होते''..

माझे शब्द जर सकारात्मक असतील तर ते शब्दच माझी वर्तणूक बनतात. माझी वर्तणूक सकारात्मक असेल तर माझी

ती वर्तणूकच म्हणजे माझी सवय बनून राहील. माझी सवय सकारात्मक असेल तर माझी सवय हीच माझी मूल्यं बनून राहील. माझी मूल्यं सकारात्मक असतील तर माझी मूल्यं हीच माझं विधिलिखित ठरतील.

असं म्हटलं जात की..फांदीवर बसणाऱ्या त्या पाखराला ती फांदी. तुटण्याची कधीच भीती नसते.. कारण त्याचा आपल्या पंखाच्या बळावर १००% विश्वास असतो. म्हणूनच आपण हाती घेतलेल्या कामात त्या चातक पक्ष्याप्रमाणे निष्ठा असायला हवी..तर मग यश हे मिळणारच आहे..चातक पक्षी हे पावसाच्या पाण्याशिवाय इतर कोणतेही पाणी पित नाही..

आपल्या आयुष्यात सर्वात महत्वाचे दोन दिवस असतात.

तुम्ही ज्या दिवशी जन्मलात तो दिवस.आणि तुम्ही कशासाठी जन्माला आला आहात,ते जेव्हा तुम्हाला कळतं तो दिवस. म्हणूनच या दिवसाची आठवण कायम लक्षात असू द्या..कारण ''इतरांच्या सावलीत उभे राहून आपण स्वतःची सावली देखील गमावतो. पण जर स्वतःची सावली निर्माण करायची असेल तर प्रत्येकालाच एक न एक दिवस ऊन्हात उभे रहावेच लागते..''

तुमचा चेहरा नेहमीच सूर्यप्रकाशाच्या दिशेने ठेवा. म्हणजे सावल्या आपोआप मागे पडतील. तसं बघितल तर

''छत्री ही पावसाला थांबवू शकते का...? तर नाहीच.. पण पावसात थांबण्याचे धाडस ती आपल्याला नक्कीच देऊ शकते, तसेच आत्मविश्वास यशस्वी होण्याची खात्री देत नाही, पण संघर्ष करण्याची प्रेरणा नक्की देतो.''

अपयशाच्या खड्ड्यातून खचून न जाता उत्साहाने वाटचाल केल्यानंतर जे समोर येतं तेच तर खरं यश असतं..!

आपण दिवसभर जे विचार करतो, त्याचा प्रभाव आपल्या एकूणच व्यक्तिमत्त्वावर आणि जीवनावर पडतो. सकारात्मक विचार ( ) म्हणजे केवळ प्रत्येक गोष्टीकडे दुर्लक्ष करून खोटं हसणं नव्हे, तर कठीण प्रसंगातही योग्य आणि उत्पादक मार्ग शोधणे होय .आपले विचार हे एखाद्या बीजाइतके शक्तिशाली असतात. जसं ''स्वच्छ व्हायचं असेल फाटावं लागतं पवित्र व्हायचं असेल तर झिजावं लागतं आणि अंकुरित व्हायचं असेल त्या बीजाला पण स्वतःला गाडून घ्यावं लागतं..''

आपल मन जसे विचार करतो, तसेच आपले जग बनते. जर आपण नेहमी वाईट गोष्टींचा विचार केला, तर जीवन निराशावादी बनते. याउलट, आशावादी दृष्टिकोन ठेवल्याने प्रत्येक आव्हान हे प्रगतीची संधी बनते.

नकारात्मकतेला द्या उत्तर: - दिवसभरात अनेकदा आपल्या मनात नकारात्मक विचार येतात. अशा वेळी लक्ष द्या: आपले विचार नक्की काय आहेत, ते ओळखा.आणि आपल्या विचारात बदल करा.. जर आपले विचार निराशावादी असतील, तर लगेच स्वतःला सांगाहे विचार चुकीचे आहेत. सकारात्मकता शोधा: प्रत्येक वाईट गोष्टीतही काहीतरी चांगले शोधण्याचा नक्कीच प्रयत्न करायला हवा. उदा. ट्रॅफिकमध्ये अडकलात, तर चिडण्याऐवजी गाणी ऐकून तो वेळ आनंदात घालवा. सकारात्मक विचारामुळे आरोग्यावर होणारे फायदे: - वैज्ञानिक संशोधनातून हे सिद्ध झाले आहे की सकारात्मक विचारांमुळे ताणतणाव कमी होतो, प्रतिकारशक्ती वाढते आणि आयुष्यही निरोगी राहते हे एका गुप्त महाशक्तीसारखे कार्य करते.

ध्येय गाठण्याची गुरुकिल्ली: ज्याप्रमाणे झाडाला पाणी घातल्यावर ते बहरते... , फुलते, फळते त्याचप्रमाणे चांगल्या विचारांनी सकारात्मक मानसिकता तयार होते. जेव्हा आपण सकारात्मक राहतो, तेव्हा आपल्यात नवनवीन गोष्टी शिकण्याची ऊर्जा निर्माण होते.आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जगात सकारात्मक विचार ही काळाची गरज आहे.. छोट्या - छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधणे आणि कृतज्ञ () राहणे हीच सुखी जीवनाची खरी गुरुकिल्ली आहे.. चला, तर मग आजपासूनच आपल्या विचारां ची पेरणी सकारात्मकतेने करूया आणि एका सुंदर भविष्याची निर्मिती करूया. तसंच आपलं जीवन आनंदी आणि सुदृढ बनवू या...!!

असं म्हटलं जातं की..''उडत्या पाखराला परतीची तमा नसावी..डोळ्यात नित्य नवी दिशा असावी..घरट्याच काय बांधता येईल केंव्हाही मात्र क्षितीजा पलिकडे धाव घेण्याची जिद्द असावी...'' मग यश हे पायाशी लोळण घेत येईल..!!

आयुष्यात आपण खूप व्यवहार करत असतो..पण आपल्याला सुख विकणारा आणि दुःख विकत घेणारा कधीच व कुठेही भेटत नाही..जी व्यक्ती तुमच्या प्रगतीवर जळते त्या व्यक्तीचा कधीच तिरस्कार करू नका..कारण ती व्यक्ती स्वतः पेक्षा तुम्हाला उत्कृष्ट समजून तुमच्यावर जळते..सकारात्मक विचार करणाऱ्याला कुठलेही विष मारू शकत नाही.. आणि नकारात्मक विचार करणाऱ्याला कोणतेच औषध बरे करू शकत नाही.. आपले आयुष्य इतके सुंदर बनवा की निराश झालेल्या व्यक्तीला तुमच्याकडे पाहून जगण्याची नवी उमेद मिळाली पाहिजे.. आणि त्याची जीवनाकडे बघण्याची दृष्टी बदलली पाहीजे..!!

**श्री. निळकंठ बाबाराव पाटील**
**मैलापूरे.. कारेगावकर**
**छ. संभाजीनगर..**
**मो. नं.- ९८८१०८४३२०**

सूर्योदय

रविवार ०५ जुलै २०२६

## संपादकीय

### हलक्या पावसाला सुरुवात

प्रतीक्षेनंतर मराठवाड्यात मान्सूनने अखेर हजेरी लावली असली तरी पेरणीसाठी आवश्यक असलेल्या दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. काही जिल्ह्यांत झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, तर अनेक भागांतील शेतकरी अजूनही समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. महिनाभरापासून दडी मारलेल्या मान्सूनने अखेर मराठवाड्यात हजेरी लावली आहे. त्यामुळे रखडलेल्या पेरण्यांना काहीसा वेग मिळण्याची शक्यता आहे. मंगळवार आणि बुधवारी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली. यामध्ये सर्वाधिक पाऊस छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत नोंदवला गेला. मात्र बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये अद्यापही पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. त्यामुळे येथील शेतकरी अजूनही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. महसूल विभागाच्या निकषानुसार, २४ तासांत ६५ मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाल्यास संबंधित मंडळात अतिवृष्टी झाल्याचे मानले जाते. दरम्यान, जालना जिल्ह्यात सर्वाधिक २१.० मिलिमीटर, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १९.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाला, तर जरंडी गावाजवळील मातीचा पूल पावसामुळे वाहून गेल्याने या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. तसेच पुराच्या पाण्यात एक दुचाकी वाहून गेली होती. मात्र ग्रामस्थांनी तत्परता दाखवत दुचाकीस्वाराचा जीव वाचवला. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात पावसानंतर ओढे आणि नाल्यांना पूर आला. आडगाव बाजार ते आडगाव फाटा या रस्त्यावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद झाली होती. त्यामुळे ग्रामस्थ आणि वाहनधारक पुराच्या पाण्यात अडकले होते. परभणी शहरात बुधवारी सकाळपासून हलक्या पावसाला सुरुवात झाली. जिल्ह्यातील पाथरी, मानवत, जिंतूर, येलदरी, सेलू, बोरी, आसेगाव आणि ताडकळस या भागांतही पावसाने चांगलीच हजेरी लावली.

नांदेड जिल्ह्यातील हदगाव, अर्धापूर, मुखेड, कंधार आणि मुदखेड या भागांत मेघगर्जनेसह दमदार पाऊस झाला. हदगाव येथे तब्बल तीन तास मुसळधार पाऊस कोसळला. या पावसामुळे नदी–नाले दुथडी भरून वाहू लागले असून काही भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले होते. नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत ८ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. आता शेतीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने उर्वरित पेरणीच्या कामाला वेग येण्याची शक्यता आहे. धाराशिव जिल्ह्यातील शेतकरीही पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. २४ जूनपर्यंत धाराशिव जिल्ह्यात सरासरीच्या १२.९ टक्के इतक्या पावसाची नोंद झाली आहे. हिंगोली जिल्ह्यात बुधवारी जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मृग नक्षत्र कोरडे गेल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या होत्या; मात्र आता पावसाने हजेरी लावल्याने हिंगोली जिल्ह्यातील शेतजमिनींमध्ये पाणी साचले आहे. मराठवाड्यात सर्वाधिक पाऊस जालना जिल्ह्यात झाल्याची नोंद आहे. जिल्ह्यातील चार महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. रामनगर महसूल मंडळात १०९ मिलिमीटर, धनगर पिंपरी येथे ९१ मिलिमीटर, तर जालना शहर आणि पाचनवडगाव येथे प्रत्येकी ८७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. अंबड शहरात ५३ मिलिमीटर पाऊस झाला. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून अनेक भागांतील शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे. बीड जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांत कमी–अधिक प्रमाणात पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पेरणीची लगबग सुरू झाली आहे. दरम्यान, राज्यात मान्सून वेगाने पुढे सरकत आहे.

बुधवारी उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील उर्वरित भागांत प्रगती करत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्याची माहिती हवामान विभागाने दिली. पुढील तीन दिवस मराठवाडा आणि विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.सध्या मराठवाड्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले असून काही ठिकाणी अधूनमधून भुरभुर पाऊस पडत आहे. त्यामुळे लवकरच दमदार पावसाला सुरुवात होईल,

# स्मार्ट मीटर त्वरित बंद करा अन्यथा मनसेचे तीव्र आंदोलन

## वाढत्या बिलाने ग्राहक त्रस्त महावितरणला निवेदन

## सक्ती केल्यास मनसे स्टाईल वापरू - सुनील साठे

रायगड जि. उ. उपसंपादक /मंगेश यादव :सुधागड तालुक्यातील नागरिक महावितरणच्या स्मार्ट मीटरच्या कारभाराने पुरते हैराण झाले असून, या विरोधात महाराष्ट्र नवनिर्वाचित सेनेने (मनसे) आक्रमक पवित्रा घेतला आहे. वाढत्या वीज बिलांमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून, या स्मार्ट मीटरची प्रक्रिया कायमची बंद करण्याच्या मागणीसाठी मनसेने सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (ता. २९) महावितरणच्या पाली विभागाचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले. या निवेदनाद्वारे, येत्या सात दिवसांत स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया न थांबल्यास जबरदस्ती केल्यास सुधागड मनसेच्या वतीने मनसे स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. काही दिवसांपासून सुधागड तालुक्यात नवीन स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम




राबवली जात आहे. मात्र, या नवीन मीटरमुळे वीज बिलात अनपेक्षित आणि अवाढव्य वाढ झाली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सामान्य ग्राहकांना हजारो रुपयांची बिले येत असल्याने त्यांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटली आहे. या समस्येची दखल घेत तालुक्यातील नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्वाचित सेनेकडे धाव घेतली आणि स्मार्ट मीटरमुळे होणाऱ्या आर्थिक लूट विरोधात आवाज उठवण्याची मागणी केली. नागरिकांच्या या मागणीला प्रतिसाद देत, महाराष्ट्र नवनिर्वाचित सेनेने तातडीने महावितरणच्या कार्यकारी अभियंता जाधव साहेबांना भेटून सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धतीत मोठी त्रुटी असून यामुळे ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणने ही प्रक्रिया तात्काळ थांबवावी.

जर पुढील सात दिवसांत स्मार्ट मीटर संदर्भातील कोणतीही ठोस कार्यवाही आणि निर्णय न दिसल्यास, सुधागड तालुक्यात मनसेच्या वतीने महावितरण विरोधात तीव्र संघर्ष छेडला जाईल, असा सज्जड दम देण्यात आला. या निवेदनाच्या वेळी मनसे तालुका अध्यक्ष सुनील साठे, पाली शहर अध्यक्ष दीपेश लहाने, चव्हाण वाडी शाखा अध्यक्ष परेश वनगळे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या आंदोलनामुळे तालुक्यात स्मार्ट मीटर विरोधातील असंतोष समोर आला आहे.

# खेडदापोली महामार्गावरील नव्या कामांवर प्रश्नचिन्ह; मोऱ्या खचल्या अपघातांची मालिका सुरू

दापोली प्रतिनिधी – खेडदापोली महामार्गावरील नव्याने करण्यात आलेल्या रस्ते व मोरी बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. महामार्गावरील विविध ठिकाणी मोऱ्या खचणे, रस्ते बसणे आणि मोठी भगदाडे पडण्याच्या घटना समोर आल्याने वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.ङ्ग गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. नव्याने बांधलेल्या मोरीलगत रस्ता खचून मोठे भगदाड पडले असून, सततच्या पावसामुळे ते आणखी वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा मुसळधार पावसात हे ठिकाण अत्यंत धोकादायक ठरत असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.ङ्ङयाशिवाय मल्हार पेट्रोल पंप, नवानगर, नवानगरमहालक्ष्मी रोड, टाळसूरे मेडिकल कॉलेज स्टॉप आणि कुंभवे जिल्हा परिषद शाळेजवळील पुलाजवळ देखील रस्ता खचल्याच्या घटना घडल्या



आहेत. या सर्व ठिकाणी तातडीने दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.ङ्ङदरम्यान, गेल्या काही दिवसांत या मार्गावर अपघातांची मालिकाच सुरू आहे. कुंभवे कातळनवशी पाटी दरम्यान पुलावर भरधाव कार कठड्याला धडकली. त्याआधी कुंभवे शाळेसमोरील उघड्या गटारामुळे अल्टो कारचा अपघात झाला होता, तर टाळसूरेनवानगर येथे रस्त्यालगत ठेवलेल्या मोरीच्या पाईपवर कार धडकल्याची घटना घडली होती. सुदैवाने या घटनांमध्ये जीवितहानी झाली नसली तरी भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.ङ्ङस्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, रस्ते बांधकाम सुरू असलेल्या अनेक ठिकाणी आवश्यक इशारा फलक, परावर्तित चिन्हे, बॅरिकेड्स आणि चेतावणी दिवे पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे धोकादायक वळणे, पुल आणि खचलेल्या रस्त्यांवर वाहनचालकांना योग्य वेळी सूचना मिळत नसल्याचे सांगितले जात आहे.ङ्ङकोकणातील महत्त्वाच्या पर्यटनस्थळांना जोडणाऱ्या या महामार्गावर दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. अशा परिस्थितीत नव्याने उभारलेल्या मोऱ्याच खचल्याच्या घटनांमुळे कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.ङ्ङनागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित ठेकेदारांनी सर्व खचलेल्या ठिकाणांची तातडीने संयुक्त पाहणी करून युद्धपातळीवर दुरुस्ती करावी, दोष आढळल्यास जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी सुरक्षितता उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# खेड–खोपी–धामणंद मार्गावर भीषण भूस्खलन, कासई शिंदेवाडीजवळ दरड कोसळून रस्ता खचला, वाहतूक बंद

दापोली प्रतिनिधी: रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका आता घाटरस्ते आणि ग्रामीण भागालाही बसू लागला आहे. खेड तालुक्यातील खेड–खोपी–धामणंद या महत्त्वाच्या मार्गावर कासई शिंदेवाडी येथे खचला आणि माती, दगड तसेच झाडांसह मोठ्या प्रमाणात दरड रस्त्यावर आली. काही क्षणांतच संपूर्ण रस्ता मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडला गेला. त्याचवेळी रस्त्याचा कडेलाही तडा जाऊन काही भाग वाहून गेल्याने या मार्गावरील प्रवास अत्यंत धोकादायक बनला सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, महसूल प्रशासन, पोलीस आणि स्थानिक यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. जेसीबीसह अन्य अवजड यंत्रसामग्रीच्या सहाय्याने रस्त्यावर साचलेली माती आणि दगड हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याची शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, तसेच खेड–खोपी–धामणंद मार्गाऐवजी शक्य असल्यास पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.ङ्ङरस्ता सुरक्षित झाल्यानंतरच वाहतूक



शनिवारी पहाटे मोठे भूस्खलन होऊन डोंगराचा मोठा भाग रस्त्यावर कोसळला. या दुर्घटनेत रस्त्याचा काही भागही खचून वाहून गेल्याने मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून, परिसरातील नागरिकांसह प्रवाशांची मोठी गैरसोय झाली आहे.ङ्ङपहाटेच्या सुमारास मुसळधार पावसामुळे डोंगराचा कडा अचानक आहे.ङ्ङसुदैवाने दरड कोसळली त्यावेळी त्या ठिकाणी कोणतेही वाहन नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, या घटनेनंतर दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अनेक प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना तासन्?तास अडकून पडावे लागले.ङ्ङघटनेची माहिती मिळताच करण्यात आले आहे. मात्र, दरडीचे प्रमाण मोठे असल्याने आणि रस्त्याचाच काही भाग खचल्याने मार्ग पूर्णपणे सुरक्षित करण्यासाठी आणखी वेळ लागण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.ङ्ङदरम्यान, परिसरात अद्यापही पावसाचा जोर कायम असल्याने आणखी भूस्खलन होण्याचा धोका पुन्हा सुरू केली जाईल, अशी माहिती प्रशासनाने दिली असून, परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. पावसाळ्यात डोंगराळ भागातील रस्त्यांवर प्रवास करताना वाहनचालकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# स्वामी विवेकानंद युवकांना आत्मविश्वास देणारा महान संन्यासी होते! डॉ. भारत कऱ्हाड

स्वामी विवेकानंद यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त. ते भारतीय संन्यासी, तत्त्वज्ञ, विचारवंत आणि धर्मगुरू होते. श्री रामकृष्ण परमहंस यांचे ते प्रमुख शिष्य होते. वेदांत आणि योगाचे विचार पाश्चात्त्य जगापर्यंत पोहोचविण्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्म स्वीकाराचा विचार जगासमोर प्रभावीपणे मांडून त्यांनी भारतीय अध्यात्माला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. लहानपणापासूनच नरेंद्रनाथांना धर्म, तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांविषयी विशेष कुतूहल होते. तरुण वयात त्यांची श्री रामकृष्ण परमहंस यांच्याशी भेट झाली. पुढे ते त्यांचे समर्पित शिष्य बनले आणि त्यांनी संन्यास स्वीकारला. श्री रामकृष्ण परमहंस यांच्या निधनानंतर स्वामी विवेकानंदांनी भारतभर व्यापक भ्रमंती केली. या प्रवासात त्यांनी ब्रिटिशकालीन भारतातील दारिद्र्य, अज्ञान आणि सामान्य जनतेचे कठीण जीवन जवळून पाहिले. समाजाच्या दुःखाकडे केवळ सहानुभूतीने पाहून चालणार नाही, तर समाजसेवेचे संघटित कार्य उभे केले पाहिजे, हा विचार त्यांच्या मनात दृढ झाला. १८९३ मध्ये ते अमेरिकेतील शिकागो येथे आयोजित जागतिक धर्म संसदेत सहभागी झाले. ११ सप्टेंबर १८९३ रोजी त्यांनी ''अमेरिकेतील भगिनींनो आणि बंधूंनो...'' या शब्दांनी आपल्या ऐतिहासिक भाषणाची सुरुवात केली. धार्मिक सहिष्णुता, सार्वत्रिक स्वीकार आणि मानवबंधुत्वाचा त्यांनी दिलेला संदेश जगभर प्रभावी ठरला. शिकागोतील यशानंतर स्वामी विवेकानंदांनी अमेरिका, इंग्लंड आणि युरोपमध्ये अनेक व्याख्याने दिली. वेदांत आणि भारतीय तत्त्वज्ञानातील मूलभूत विचार त्यांनी पाश्चात्त्य समाजापर्यंत पोहोचविले. त्यांच्या कार्यामुळे भारतीय संस्कृती आणि अध्यात्माकडे जगाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत झाली. भारतात परतल्यानंतर त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली आणि रामकृष्ण मठाच्या कार्याला संघटित स्वरूप दिले. अध्यात्म, शिक्षण, समाजसेवा आणि मानवतावादी कार्य यांचा सुंदर समन्वय या संस्थांच्या माध्यमातून घडविण्यात आला. स्वामी विवेकानंद हे केवळ धर्मगुरू नव्हते. ते आधुनिक भारतातील महान विचारवंत आणि राष्ट्रजागृतीचे प्रेरणास्थान होते. भारतीय युवकांनी स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवावा, निर्भय व्हावे आणि राष्ट्राच्या उभारणीत योगदान द्यावे, हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांच्या जन्मदिनी, १२ जानेवारी रोजी, भारतात राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. ''उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका.'' कठोपनिषदातील विचारातून प्रेरित हा संदेश स्वामी विवेकानंदांनी जनमानसात पोहोचविला. जागृती, आत्मविश्वास आणि ध्येयपूर्तीची प्रेरणा देणारा त्यांचा हा विचार आजही तितकाच सामर्थ्यवान आहे. महान राष्ट्रप्रेरक संन्यासी स्वामी विवेकानंद यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!



# पोफळी प्राथमिक शाळेत शालेय मंत्रिमंडळ निवडणूक उत्साहात; अंशुल पवार व मानसी साळुंखे विजयी

पोफळी : परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित प्राथमिक शाळा, पोफळी येथे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी आणि मतदान प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळावी या उद्देशाने शालेय मंत्रिमंडळ निवडणूक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.ङ्ङया निवडणुकीत इयत्ता चौथीतील सात विद्यार्थ्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. प्रत्येक उमेदवाराला स्वतंत्र निवडणूक चिन्ह देण्यात आले होते. इयत्ता दुसरी, तिसरी व चौथीतील विद्यार्थ्यांसह प्रशालेतील शिक्षकांनी मतदानाचा हक्क बजावत लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदविला. गुप्त मतदान पद्धतीने झालेल्या या निवडणुकीत अंशुल पवार व मानसी साळुंखे यांना सर्वाधिक मते मिळाल्याने अनुक्रमे विद्यार्थी प्रतिनिधी व विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड करण्यात आली.ङ्ङया निवडणुकीत आरोग्य मंत्री अमोघ जोशी,अभ्यास मंत्री अद्विका भुजबळ,स्वच्छता मंत्री विघ्नेश देसाई, परिपाठ मंत्री गार्गी पानगले,क्रीडा मंत्री मानस देशमुख यांची निवड करण्यात आली.ङ्ङनिवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया मतदार यादी, मतदान, मतमोजणी आणि निकाल जाहीर करणे अशा टप्प्यांनुसार पार पडली. यामुळे विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्थेतील मतदानाचे महत्त्व, जबाबदारी आणि निवडणूक प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळाली.ङ्ङप्रशालेचे मुख्याध्यापक श्री. महेंद्र कापडी यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ शिक्षिका शिवानी शिंदे तसेच प्रतिभा धुमाळ, अशोक मिसाळ, मनीषा नाईक, अक्षता साळवी आणि सरिता मानकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करून निवडणूक यशस्वीरीत्या पार पाडली. हा उपक्रम आनंददायी शनिवार अंतर्गत घेण्यात आला.पालक व शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवण करणारा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे मत व्यक्त केले.




# पालपेणे शाळा नं. २ च्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अमित खांडेकर यांची निवड

आबलोली(संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील पालपेणे शाळा नं. २ च्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अमित खांडेकर यांची निवड करण्यात आली. पालपेणे शाळा नं. २ च्या शाळा व्यवस्थापन समितीची सभा शाळेमध्ये उत्साहात पार पडली. या सभेमध्ये अध्यक्षपदी अमित गंगाराम खांडेकर, उपाध्यक्षपदी आवणी नरेश टाणकर यांची निवड करण्यात आली. या सभेला शाळेचे माजी मुख्याध्यापक दत्ताराम समगिस्कर, मुख्याध्यापक विश्वास सावंत, मदन गिजे, अशोक पाटे, मनोहर पवार तसेच माजी अध्यक्ष राजेश घाणेकर, माजी अध्यक्ष विनायक घाणेकर, सदस्य परेश कदम तसेच पवार सर, माजी उपाध्यक्ष सुहाना आदवडे व इतर सदस्य उपस्थित होते.ङ्ङयावेळी बोलताना शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमित खांडेकर यांनी सांगितले की, शाळा व्यवस्थापन समितीने माझ्यावर विश्वास ठेवून समितीचे अध्यक्षपद बिनविरोध दिले आहे. त्याबद्दल मी सर्वांचे आभारी असून सर्वांच्या सहकार्यातून शाळेची शैक्षणिक प्रगती करण्यावर भर दिला जाईल. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि पालक व शाळा यांच्यात अधिक दृढ समन्वय निर्माण करण्याचा माझा प्रयत्न असेल. अमित खांडेकर यांचे अभिनंदन करण्यात येत असून शाळेच्या शैक्षणिक विकासासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत



# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

हृदयविकारग्रस्थांसाठी पेसमेकर ठरतेय वरदान

अलीकडच्या काळातील आधुनिक जीवनशैली हि अत्यंत धावपळीची,ताणतणावग्रस्त,चुकीच्या आहार पद्धतीची बनलेली आहे. अर्थात त्यामुळेच साधारणपणे वयाच्या चाळिशीनंतरचे मानवी जीवन हे तितकेच धोक्याचे बनलेलं दिसते. ताणतणावग्रस्त जीवनशैलीमुळे हृदयाचे जे काही आजार उद्भवतात त्यामध्ये ब्रॅण्डीकार्डिया या आजाराचे प्रमाण भारतात मोठे आहे. परंतु यावर कृत्रिम पेसमेकर हे आधुनिक वैद्यकशाश्त्राने मानवाला दिलेले जीवनाचे वरदानच आहे. महाराष्ट्रातील नवी मुंबईच्या अपोलो हॉस्पिटलने वायरलेस किंवा लीडलेस पेसमेकर रोपणा मध्ये एक महत्वाचा टप्पा पार केला आहे. याच अनुषन्गाने अपोलो हॉस्पिटलचे इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजी चे वरिष्ठ सल्लागार आणि भारतातील लिडलेस पेसमेकर तंत्रज्ञानाचे राष्ट्रीय प्रोक्तर असलेले डॉ. संजीवकुमार कळकेकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.



१हृदयाशी संबंधित ब्रॅण्डीकार्डिया या आजारासंदर्भात काय सांगाल?

आपल्या देशात वाढत्या वयाबरोबर हृदयाशी संबंधित रक्तवाहिन्यांचे आजार देखील वाढत आहेत यामध्ये ब्रॅण्डीकार्डिया ग्रस्त हृदयविकार असलेल्या रुग्णांची संख्या वाढतेय. या आजारात आपले हृदय हे शरीराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक तितक्या वेगाने धडधडत नाही. हा आजार हृदयाच्या विद्युत वाहक प्रणालीच्या वयानुसार होणाऱ्या ऱ्हासामुळे उदभवू शकतो. किंवा हृदयविकाराच्या झटक्यामुळे,काही औषध किंवा मधुमेहामुळे आणि उच्चरक्तदाबामुळे देखील उदभवू शकतो. चक्कर येणें,धाप लागणे,थकवा,अस्वस्थपणा हि या आजराची लक्षण आहेत. मात्र,आता आधुनिक वैद्यकशास्त्राने यावर पेसमेकर देऊन मानवाला वरदानच दिलेले आहे.

२पारंपरिक पेसमेकर आणि आधुनिक पेसमेकर यामध्ये नेमका काय फरक आहे?

पारंपरिक पेसमेकरच्या विपरीत,ज्यामध्ये त्वचेखाली शस्त्रक्रियेची पोकळी करावी लागत होती,आणि इन्सुलेटेड लीड्स शिरामधून हृदयात नेल्या जात होत्या. आधुनिक लिडलेस हे एक सूक्ष्म उपकरण आहे. मांडीजवळील शिरेतून लहान छिद्राद्वारे कॅथ्रेटच्या साहाय्याने ते थेट हृदयात बसवले जाते. पारंपरिक प्रणालीपेक्षा अंदाजे ९३ टक्के लहान असलेले हे उपकरण छातीवरील चिरा,दिसणारी उपकरणाची पोकळी आणि पेसींग लीड्सची गरज संपवते. विशेष म्हणजे आधुनिक पेसमेकर ची शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्ण चार तासात घरी जाऊ शकतो. फक्त अशा रुग्णाला काही नॉर्मल बंधन पाळावी लागतात.

३आधुनिक लीडलेस पेसमेकर हे मानवासाठी कशा प्रकारे वरदान ठरले आहे?

लीडलेस पेसमेकरमुळे शस्त्रक्रियेच्या पोकळीशी संबंधित अनेक आव्हानांना टाळून तिचा वापर रुग्णाचा जीव वाचविणारी थेरेपी म्हणून करू शकतो.आजवर अपोलो हॉस्पिटलमध्ये अशा २५ हुन अधिक यशश्वी पेसमेकर शस्त्रक्रिया आम्ही केलेल्या आहेत. लीडलेस पेसमेकर ट्रान्सवेन्स लीड्स काढून टाकत असल्याने ते लीड फ्रॅक्चर,लीडचे स्थान बदलणे,शिरांमधील अडथळा आणि पोकळीतील संसर्गाचा धोका लक्षणीयरीत्या कमी करतात. आधुनिक उपकरणे एमआरआय सुसंगत आहेत. या रुग्णांचे अपेक्षित बॅटरी आयुष्य अंदाजे १२ ते १८ वर्ष आहे. त्यानंतर पुन्हा नव्याने पेसमेकर बसवावा लागतो. या पेसमेकर करीता १८ ते २० लाखांचा खर्च येतो.

२ नोंद

मुंबई ठरली भारताची 'कॅट कॅपिटल'

भारताची 'कॅट कॅपिटल' म्हणून ओळख मिळवलेल्या मुंबईत, मांजरांच्या खाद्यपदार्थांनी कुत्र्यांच्या खाद्यपदार्थांना मागे टाकत प्लॅटफॉर्मवरील सर्वाधिक लोकप्रिय पर्याय म्हणून स्थान मिळवले आहे. हा कल देशभरात दिसून येत असून, आता पाळीव प्राण्यांच्या खाद्यपदार्थांच्या एकूण मागणीत जवळपास ६०% वाटा मांजरांच्या खाद्यपदार्थांचा आहे. भारतातील लोकांचे आपल्या पाळीव प्राण्यांशी असलेले नाते झपाट्याने बदलत असून अधिक जिव्हाळ्याचे आणि काळजीवाहू होत आहे. ग्रेन-फ्री जेवण, गॉरमेट ट्रीट्स, प्रीमियम ग्रूमिंग किट्स आणि विशेष पोषणापासून ते विविध उत्पादनांपर्यंत, देशभरातील पेट पॅरेंट्स आपल्या लाडक्या पाळीव प्राण्यांच्या आरोग्याची आणि आनंदाची अधिक काळजी घेत आहेत.इंस्टामार्टने पेट केअर ऑर्डर्समध्ये ४१% वाढ नोंदवली आहे. ग्राहक आता केवळ मूलभूत गरजांपुरते मर्यादित न राहता, आपल्या पाळीव प्राण्यांच्या आरोग्याकडे स्वतःच्या आरोग्याइतक्याच गांभीर्याने पाहत आहेत. डॉग शॅम्पूच्या शोधांमध्ये जवळपास ६००% वाढ झाली आहे, ग्रेन-फ्री पेट फूडमध्ये वर्षानुवर्षे १५२% वाढ झाली आहे आणि ट्रीट्स श्रेणीने इतर सर्व पेट उत्पादन श्रेणींना मागे टाकले आहे.एकूणच, बेंगळुरू, हैदराबाद आणि दिल्ली ही सर्वात मोठी पेट केअर बाजारपेठेची केंद्रे असली तरी, खरी वाढ इतरत्र दिसून येत आहे. टियर + शहरांमध्ये पेट केअर ऑर्डर्समध्ये वर्षानुवर्षे ९६% वाढ झाली आहे. कुत्राप्रेमी विरुद्ध मांजरप्रेमी या चर्चेला उत्तर देणाऱ्या आकडेवारीनुसार, इंस्टामार्टवरील पाळीव प्राण्यांच्या खाद्यपदार्थांच्या एकूण मागणीत मांजरींच्या खाद्यपदार्थांचा वाटा जवळपास ६०% आहे. मांजरींच्या संगोपनात मुंबई भारताची 'कॅट कॅपिटल' म्हणून अव्वल स्थानावर आहे.

३ चला पर्यटनाला

नाशकातील दूधसागर धबधबा

नाशिक हे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले छोटे शहर आहे. हे शहर एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे, कारण येथे कुंभमेळ्याचा केंद्रबिंदू आहे. तुम्ही वर्षाच्या कोणत्याही वेळी शहराला भेट देऊ शकता, कारण हवामान खूप आनंददायी आहे. हे अशा मोजक्या शहरांपैकी एक आहे जिथे लोक पावसाळ्यातही सुरक्षितपणे ट्रेकिंगला जाऊ शकतात. नाशिकमध्ये मोठ्या संख्येने पाहण्यासारखी ठिकाणे आहेत त्यामुळे अनेक पर्यटक येथे येतात. तुम्ही नाशिकमध्ये नवीन असाल किंवा फेरफटका मारण्यासाठी या ठिकाणाला भेट द्यायची असल्यास, या नाशिकच्या पर्यटन स्थळांवर एक नजर टाका, जी तुमच्या प्रवासाचा एक भाग असावी. नाशिकमधील दूधसागर धबधबा हे नाशिकच्या जवळील सर्वोत्तम पर्यटन स्थळांपैकी एक आहे. धबधबा खूपच प्रभावी आहे आणि त्याच्या सामर्थ्याने आणि सौंदर्याने तुम्हाला मंत्रमुग्ध करेल. मुख्य शहरापासून थोड्याच अंतरावर असलेला धबधबा, ज्याला सोमेश्वर धबधबा म्हणूनही ओळखले जाते, शांत वातावरणात स्थित आहे. जरी त्याची लक्षणीय उंची नसली तरी, पावसाळ्यात धबधबा पूर्ण क्षमतेने आणि खरोखर पाहण्यासारखे आहे. तुम्हाला भेट द्यावी लागेल खाजगी वाहतूक वापरून ठिकाण आणि परिसरात एक दिवस सहलीची योजना करू शकता. गर्दीच्या शहरापासून दूर विचित्र पिकनिकसाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. नाशिक बसस्थानकापासून दूधसागर धबधबा ९ किमी अंतरावर आहे आणि स्थानिक वाहतुकीने येथे पोहोचता येते.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार ०५ जुलै २०२६


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# मेटे परिसरातील थरारक घटना : रेल्वेतून उडी; महिलेचा मृत्यू, फरार आरोपी व चिमुकला जखमी

## दोन गुन्ह्यांतील फरार आरोपी सचिन जुवळे असल्याचे तपासात उघड आत्महत्येच्या चिठ्ठीचीही चर्चा

दापोली प्रतिनिधी :

तालुक्यातील मेटे परिसरात शुक्रवारी (३ जुलै) सायंकाळी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेतून तिघांनी उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली.

या घटनेत अंजनी बौद्धवाडी येथील शुभ्रा अतिश दिवेकर (वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे) यांचा जागीच मृत्यू झाला, तर खेड पोलीस ठाण्यातील दोन गुन्ह्यांमध्ये फरार असलेला आरोपी सचिन सत्यवान जुवळे आणि त्याच्यासोबत असलेले एक लहान मूल जखमी झाले. दोघांवर कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, शुभ्रा दिवेकर, सचिन जुवळे आणि एक लहान मूल मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेतून प्रवास करत होते. मेटे परिसरात चालत्या रेल्वेतून तिघांनी उडी मारल्याने ही दुर्घटना घडली. घटनेची माहिती मिळताच कोतवलीचे पोलीस पाटील श्रीकांत जाधव घटनास्थळी दाखल झाले.

त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी साडेसहा ते पावणे सातच्या दरम्यान रेल्वे काही वेळ थांबली होती.

त्यावेळी महिला मृतावस्थेत आढळली, लहान मुलगा शुद्धीत होता, तर सचिन जुवळे बेशुद्ध अवस्थेत पडलेला होता.

रेल्वे प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी जखमींना तातडीने खेड येथे हलवून उपचारासाठी दाखल केले.तपासादरम्यान सचिन जुवळे हा खेड पोलीस ठाण्यातील रेकॉर्डवरील आरोपी असून दोन गुन्ह्यांमध्ये फरार असल्याचे समोर आले. ता. १२ मे २०२६ रोजी स्वतःचे घर पेटवून दिल्यानंतर तो फरार झाला होता. त्याची दुचाकी ता. १६ मे रोजी लोटे-आवाशी येथे बेवारस अवस्थेत आढळून आली होती. जून महिन्यात चिपळूण परिसरात त्याचा माग काढण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला होता; मात्र तो वालोपे परिसरातील डोंगर भागात पसार झाला होता. संबंधित महिला सचिन जुवळे यांच्यासोबत वास्तव्यास असल्याची माहितीही स्थानिकांकडून मिळाली आहे.

घटनास्थळी तसेच जखमी सचिन जुवळे यांच्या खिशात उंदीर मारण्याचे औषध आणि आत्महत्येचा उल्लेख असलेली कथित चिठ्ठी सापडल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, या बाबत अद्याप पोलिसांनी अधिकृत पुष्टी केलेली नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विवेक अहिरे, पोलीस उपनिरीक्षक केंद्रे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी पंचनामा केला. शुभ्रा दिवेकर यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून जखमी सचिन जुवळे आणि लहान मुलावर उपचार सुरू आहेत. या संपूर्ण घटनेचा अधिक तपास खेड पोलीस करीत आहेत.

# नागोठणे पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

## गोवंश हत्या करणारे तिघजण अटकेत, पोलिस निरीक्षक रविंद्र पारखे यांची दमदार एंट्री

सहसंपादक -: नारायण म्हात्रे

नागोठणे पोलिस ठाण्याचे धडाकेबाज नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलिस निरीक्षक रविंद्र पारखे यांच्या नेतृत्वाखाली वासगाव जंगल परिसरात धाड टाकून गोवंश जनावरांच्या अवैध कत्तलीचा पर्दाफाश करत यातील मुख्य तीन आरोपींवर कारवाई करत ३० हजार ६६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत आपल्या कामातील हजर जबाबीपणा दाखवण्यात आला असून, घटनास्थळावरून अन्य साहित्य यामध्ये प्रामुख्याने तीन प्लास्टिकच्या गोणींमध्ये दोन गोवंशीय जनावरांचे अवयव व मांस, जमिनीवरील मांसाचे तुकडे, पाच लहान-मोठे सुरे, कानस तसेच एका झाडाला बांधलेली गोवंशीय जनावर आढळून आले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. महेश कांबळे यांनी घटनास्थळी पंचांसमक्ष मांसाचे नमुने तपासणीसाठी सिलबंद केले. या कारवाईत दोन कत्तल केलेल्या गोवंश तसेच एक जिवंत गाय, शस्त्रे, अन्य साहित्य असा एकूण ३०६६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ङ्ग सदरची घटना गुरुवार ०२ जुलै रोजी सहाय्यक पोलिस निरीक्षक रविंद्र पारखे यांना गुप्त बातमीदारामार्फत नागोठणे मिरानगर गावातील जंगल परिसरात गोवंशीय जनावरांची अवैध कत्तल सुरू असल्याची माहिती मिळाली. विशेष पथकाने



वासगाव गावाच्या परिसरात रस्त्यालगतच्या जंगलात धाड टाकली यावेळी झाडाझुडपांत तीनजण मांस कापत असल्याचे आढळून आले. पोलिसांची चाहूल लागताच ते पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. ही धडाकेबाज कामगिरी सहाय्यक पोलिस निरीक्षक रविंद्र पारखे, पोलिस उपनिरीक्षक राजहंस नागदिवे, पोलिस उपनिरीक्षक नरेश थळकर, सहाय्यक फौजदार कृष्णा म्हात्रे, पोलिस हवालदार अथर्व पाटील, पोलिस हवालदार चंद्रशेखर नागावकर, वहातुक शाखेचे पोलिस हवालदार मनोहर माळी, पोलिस कॉन्स्टेबल स्वप्नील भालेराव, पोलिस शिपाई बळी पुटेवाड, विक्रांत बांधणकर, शिवदास धुळगंडे आदी पथकाने ही धडाकेबाज कामगिरी केली असून या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहीता कलम ३२५, ३(५), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारणा २०२५) मधील कलम ५ व ९ तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० च्या कलम ११ अंतर्गत नागोठणे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस सब इन्स्पेक्टर राजहंस नागदिवे हे करत आहेत. या धाडसी कारवाई बद्दल नागोठणे परिसरातून सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे आणि संपूर्ण पोलिस पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सौ. श्रुतीका कोटकुंडे यांचा लायन्स क्लब चिपळूणतर्फे सन्मान

चिपळूण : समाजाप्रती असलेली संवेदनशील जाणीव आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या निःस्वार्थ कार्याची दखल घेत लायन्स क्लब सातत्याने कार्यरत असून त्यांच्या या उपक्रमाचा विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनाही मोठा लाभ होत आहे.ङ्गत्यांच्या या समाजहिताच्या निःस्वार्थ सेवेला मानवंदना




चिपळूणच्या वतीने मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सौ. श्रुतीका कोटकुंडे यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.ङ्गडॉ. कोटकुंडे या स्वतःचा मौल्यवान वेळ आणि वैयक्तिक खर्चाची पर्वा न करता पूर्ण प्राथमिक शाळा, रावतळे येथे नियमितपणे भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक आणि नैतिक जडणघडणीसाठी मार्गदर्शन करत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सकारात्मक विचारसरणी, चांगले संस्कार आणि जीवनमूल्ये रुजविण्यासाठी त्या म्हणून लायन्स क्लब चिपळूणच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.ङ्गयावेळी लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. कोटकुंडे यांच्या कार्याचे कौतुक करत, समाजातील मानसिक आरोग्याविषयी जनजागृती आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांचे योगदान प्रेरणादायी असल्याचे सांगितले. त्यांच्या पुढील सामाजिक आणि शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छाही व्यक्त करण्यात आल्या.

# माणगांव शहरात जागोजागी कचऱ्याचे ढिगारे, त्यामुळे फुल झाले गटारे,

माणगांव शहर प्रतीनिधी -सुशांत लाड. माणगांव नगरपंचायत च्या क्षेत्रात बहुतांश भागात कचरा उघड्यावर टाकला जात




असल्याचे प्रकार समोर येत आहेत.नगरपंचायत कडून हा कचरा वेळेत उचलला जात नसल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीगारे तयार होऊ लागले आहेत.असे प्रकार घडत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.जागोजागी साचलेले कचऱ्याचे ढीग आणि पसरलेली दुर्गंधी यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आणि लहान मुलांचे आरोग्य पूर्णपणे धोक्यात आले आहे,हे कचऱ्याचे ढीग हे मोठ्या प्रमाणात रस्ता लागत आहेत.त्यामुळे शाळेत जाणारे लहान मुलं व त्यांना घेऊन जाणारे पालक यांना नाक बंद मुठीत घेऊन जावे लागत आहे, माणगाव शहरात स्वच्छतेचे तीन तेरा वाजले आहेत.गटाराचा पाणी रस्त्यावर साचल्यामुळे रोगराई पसरण्याची जनमानसात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, त्यामुळे नगरपंचायतने लक्ष घालून स्वच्छतेवर लक्ष द्यावे अशी नागरिकांची मागणी होत आहे.

# आपल्या शैक्षणिक संस्थांचा विस्तार वेगाने मग मोडकळीस आलेल्या पनवेल आयटीआय शैक्षणिक संस्थेकडे दुर्लक्ष का

पनवेल प्रतिनिधी- सुनील जाधव

नवी मुंबई,पनवेल शहरातील शैक्षणिक विकासाच्या गप्पा आणि मोठमोठ्या शैक्षणिक प्रकल्पांच्या घोषणांमध्ये विद्यार्थ्यांसाठी महत्वपुर्ण असलेली पनवेल आयटीआय मात्र आजही दुर्लक्षित अवस्थेत असल्याचा आरोप नागरिक आणि विद्यार्थ्यांकडुन होत आहे.अनेक वर्षांपासुन मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आणि शैक्षणिक सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला




आहे.पनवेल परिसरातील अनेक लोकप्रतिनिधी,राजकीय नेते आपल्या संस्थांच्या शाळा,महाविद्यालये आणी शैक्षणिक संकुलांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला.आधुनिक इमारती,भव्य कॅम्पस आणि नव्या सुविधा उभारण्यासाठी पुढाकार घेतला गेला.मात्र शासनाच्या अखत्यारीतील आणि हजोरो सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबधित असलेल्या पनवेल आयटीआयच्या पुनर्बांधणीसाठी किंवा आधुनिकीकरणासाठी ठोस प्रयत्न झाले का?असा सवाल नागरिकांडुन उपस्थित केला जात आहे.तांत्रिक शिक्षण हे रोजगार निर्मितीचे महत्वाचे साधन मानले जाते,औद्योगिक क्षेत्राच्या जवळ असलेल्या पनवेल सारख्या शहरात अत्यानुनिक औद्योगिक प्रशिक्षण संस्था उभारणे ही काळाची गरज असताना विद्यार्थ्यांना मोडकळीस आलेल्या इमारतीत शिक्षण घ्यावे लागत असल्याची खंत सर्वसामान्यांकडुन व्यक्त केली जात आहे.या विषयावर विधानसभा,विधानपरिषद किंवा सबंधित विभागांकडे प्रश्न उपस्थित करण्यात आले का?याची माहिती जनतेसमोर येणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.स्वतःच्या संस्थाच्या शाळा आणि महाविद्यालयासाठी वेळ आहे मग सर्वसामान्यांच्या पनवेल आयटीआय साठी पुढाकार घेणार कधी? असा सवाल पनवेल जनता विचारीत आहे.पनवेल आयटीआयच्या पुनर्बांधणीचा आराखडा,निधी आणि काम सुरु होण्याची निश्चित तारीख जाहीर करुन विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी आता सर्व स्तरांमधुन होत आहे.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )